प्रकरण सहावे

# वस्तुसंग्रहालय – एक पर्यटन स्त्रोत

## प्रकरण सहावे

# वस्तुसंग्रहालय एक पर्यटन स्त्रोत

आदिमानव काळापासून प्रवास हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक बनून राहिला आहे. अन्नासाठी चाललेली भटकंती शेतीच्या शोधाने संपली, मानव कायम स्वरूपाची वस्ती करून राहु लागला. विविध कारणासाठी त्याचा प्रवास मात्र सुरूच राहिला. सध्या ज्याला आपण पर्यटन म्हणतो त्याचे मूळ प्राचीन प्रवासात आहे. प्रवासाच्या तुलनेत पर्यटन ही संकल्पना आधुनिक आहे. मात्र सध्याच्या पर्यटनाचे स्वरूप अनेक अर्थाने बदलत चालले आहे. निसर्ग पर्यटन. ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, आरोग्य व शैक्षणिक पर्यटन असे पर्यटनाचे बदलते स्वरूप आहे. त्यामुळे कोल्हापूरला ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक स्थळामुळे पर्यटन क्षेत्रात स्थान प्राप्त होत आहे. यामध्ये कोल्हापूरातील वस्तुसंग्रहालयाची पर्यटन क्षेत्रात भूमिका काय आहे ? कोल्हापूरच्या पर्यटन क्षेत्रात वस्तुसंग्रहालयाचे स्थान आहे का? या दृष्टीकोणातून प्रस्तुत प्रकरणात पर्यटनाची व्याख्या, कोल्हापूरच्या पर्यटन विकासातील प्रेरक घटक, वस्तुसंग्रहालय व शैक्षणिक भूमिका, वस्तुसंग्रहालयाबद्दल पर्यटकांचे अभिप्राय व सूचना या अनुषंगाने अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

**पर्यटन : संज्ञा व व्याख्या :** 'पर्यटन' ही संज्ञा 'प्रवास'(Tour) या शब्दाशी संबंधित आहे. 'प्रवास'हा शब्द लॅटिन भाषेतील 'Tornnos' (वर्तुळ किंवा वर्तुळाकार प्रवास) या शब्दापासून आलेला आहे.[१] याच शब्दापासून पुढे 'वर्तुळाकार प्रवास' (Round Tour) हा शब्द रूढ झाला व इ.स. १६४३ मध्ये प्रथम तो वापरण्यात आला. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे किंवा वर्तुळाकार प्रवास करणे या अर्थाने तो वापरला. 'Tours' या शब्दाची आणखी एक व्युत्पत्ती लावली जाते की, हा शब्द हिब्रू भाषेतील 'Torah' (शोध घेणे) या शब्दापासून आलेला आहे. याशिवाय 'Torah' हा ज्यू धार्मियांचा कायद्याचा ग्रंथ देखील आहे.[२]

पर्यटन म्हणजे काय ? यांची व्याख्या करण्याचा प्रयत्न प्रा. हुंझीकर व प्रा. क्रॉप यांनी प्रवास, वास्तव्य, वेळ, मोबदला या घटकांना अनुसरूण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते,

"Tourism is the sum of the phenomenon and relationship arising from travel and stay of non-resident in so for as they do not lead to permanant residence and are not connected with any earning activity" [3]

ब्रिटनमधील कार्डिफ येथील पर्यटन संस्थेने इ.स. १९८१ मध्ये आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय पर्यटन चर्चा सत्रात पर्यटनाची व्याख्या पुढीलप्रमाणे केलेली आहे,

"Tourism is the temporary short-term movement of people to destinations out side the place where they normally live and work and their activities during the stay at there dest inations; it includes movement for all purposes as well as day visits or excursion's" [4]

**पर्यटनाचे बदलते स्वरूप :** प्राचीन काळापासून मानव विविध कारणासाठी प्रवास करत आहे, यामध्ये अज्ञात स्थळाचा शोध घेणे, चमत्कारिक व नविन स्थळांना भेट देणे, पर्यावरणातील बदल अनुभवणे, धार्मिक दृष्टया पवित्र स्थळांना भेट देणे इत्यादीचा समावेश होता. प्रवासाच्या तुलनेत पर्यटन ही संकल्पना आधुनिक व शास्त्रीय आहे.[५] आनंद मिळवणे हे पर्यटनाचे पूर्वीचे स्वरूप सध्या देखील कायम आहे. प्राचीन भारतीय संस्कृत वाड्.मयामध्ये प्रवासाचे तीन भाग किंवा प्रकार सांगितलेले आहेत.

१. पर्यटन : मनोरंजन व ज्ञानासाठी प्रवास करणे.

२. देशाटन : अर्थाजनासाठी प्रवास करणे.

३. तिर्थाटन: देवदर्शनासाठी प्रवास करणे.[६] यामध्ये व्यक्तीने नेहमीच्या राहत्या ठिकाणाहुन इतस्त्र केलेले अल्पकालीन स्थलांतर गृहित धरलेले आहे. मात्र यामधील केवळ पर्यटनाचा विचार केला तर हा घटक काही विशिष्ठ वर्गापूरता मर्यादित होता. सध्या समाजातील सर्व स्तरातील व्यक्ती कडून वेगवेगळया कारणासाठी पर्यटन होत आहे. याला 'पर्यटनाचे लोकशाहीकरण'[७] असे म्हणतात. यातूनच पुढे 'सामाजिक पर्यटन' [८] ची

(Social Tourism ) संकल्पना उदयास आली आहे. परिणामी पर्यटन विकासाला चालना मिळून पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली आहे. सामाजिक पर्यटनाविषयी प्रा. हुझीकर म्हणतात,

"Social tourism is a typeof tourism practised by low income groups, and which is renderd possible and facilited by entirely separate and there fore easily recognizable servies " [९]

इ.स.१९९० नंतरच्या दशकामध्ये पर्यटनाच्या स्वरूपात आमूलाग्र बदल झालेला आहे. साहस पर्यटन, वैद्यकीय पर्यटन, समुद्र किनाऱ्यावर फेरफटका, ऐतिहासिक पर्यटन इ. यामध्ये प्रामुख्याने समावेश आहे. साहस पर्यटनामध्ये डोंगर चढाई, उंच ठिकाणी चढणे, खोल दरीत उतरणे (कडा चढणे किंवा उतरणे) इत्यादी. वैद्यक पर्यटनात ध्यान धारणा करण्यासाठी, आयुर्वेदिक मसाज करण्यासाठी जाणे (केरळ आयुर्वेदिक पर्यटनासाठी प्रसिध्द आहे) इत्यादी, तर ऐतिहासिक पर्यटनात किल्ले पाहणे, संग्रहालये पहाणे, जुन्या जतन केलेल्या वस्तूचे निरीक्षण करणे इत्यादीचा समावेश होतो.[१०] याशिवाय शैक्षणिक पर्यटन (Education Tourism) पर्यटन याला अधिक महत्व प्राप्त होत आहे. कारण जागतिकी करणामुळे शैक्षणिक क्षेत्रात अमूलाग्र स्वरूपाचे बदल होत आहे.[११] त्यामुळे विविध शैक्षणिक संस्था विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठी व स्वत:कडील शैक्षणिक उपलब्धतेची माहिती करून देण्यासाठी 'Education exhibiton' भरवतात. त्याबरोबर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष दर्शनातून म्हणजे दृक-श्राव्य माध्यमातून शिक्षण देण्याचा कल वाढत आहे. त्यामुळे अनेक शैक्षणिक संस्था शैक्षणिक सहलीचे आयोजन करून प्रदर्शने वस्तुसंग्रहालये दाखवतात.

**कोल्हापूर पर्यटन विकासातील प्रेरक घटक :** पर्यटन विकासामध्ये पर्यटन स्थळ, निवास व्यवस्था, वाहतूक व्यवस्था व भोजनगृह (Food facility) या घटकांना महत्व आहे.[१२] त्यामुळेच आपले गाव वा शहर आपल्याला कितीही प्रिय असले तरी

प्रत्येक गाव वा शहर पर्यटन केंद्र होऊ शकत नाही. कारण त्यासाठी कोणते ना कोणते नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आकर्षण लागते आणि ते पर्यटकांना आकर्षित करत असते. याच कारणाने स्थळ हा पर्यटन विकासातील महत्वाचा घटक आहे. या घटकामध्ये नैसर्गिक स्थळे, ऐतिहासिक वास्तु व ठिकाणे, धार्मिक स्थळे, शैक्षणिक संस्था, मनोरंजनाची ठिकाणी, वस्तुसंग्रहालये , प्राणी संग्रहालये व अभयारण्य अशा अनेकविध घटकांची पर्यटन विकासात महत्वाची भूमिका आहे. यामध्ये पर्यटक ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची निवड अधिक संख्येने करताना दिसतात. कोल्हापूर हे धार्मिक, ऐतिहासिक, व सांस्कृतिक शैक्षणिक दृष्टया महत्वाचे ठिकाण आहे व अनेक पारंपारिक वैशिष्टयासह आधुनिकीकरणाची साथ संगत करत एक पर्यटन केंद्र म्हणून उदयास येत आहे. त्यामुळे कोल्हापूरला येणाऱ्या पर्यटकांची संख्या अधिक आहे.

**महालक्ष्मी मंदिर :** कोल्हापूरला करवीर निवासनी श्री. महालक्ष्मी मंदिरामुळे दक्षिण काशीचा मान मिळालेला आहे. महालक्ष्मीचे मंदिर घडीव काळ्या पाषाणात चालुक्य शैलीत बांधलेले आहे. सूर्याच्या दक्षिणायन आणि उत्तरायणाच्या प्रारंभीचे तीन दिवस सूर्याचे किरण अनुक्रमे देवीच्या पावलावर, शरीरावर व संपूर्ण मूर्तीवर पडतात.[१३] या दिशातंत्राचा मंदिर रचनेत केलेला चमत्कार पाहण्यासाठी या काळात गर्दी असते. महालक्ष्मी मंदिरातील नवरात्र महोत्सव हे पर्यटकांचे आर्कषण आहे.

**रंकाळा तलाव :** कोल्हापूरच्या नेऋत्येला प्रशस्त व प्रेक्षणीय असा हा तलाव इ.स. १८८५ मध्ये बांधल्याची नोंद मिळते. रंक भैरवाचे नाव या तलावाला दिल्यामुळे त्यास रंकाळा म्हणतात.[१४] या तलावामध्ये संध्यामठ आहे. मोठा जलाशय व नयनमनोहर परिसरामुळे यास कोल्हापूरची 'मरीन ड्रॉईव्ह' म्हणून संबोधले जाते. या ठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या देखील जास्त आहे.

**शालिनी पॅलेस :** रंकाळा तलावाच्या पश्चिमेकडील बाजूवर असलेला हा राजवाडा इ.स.१९३१ ते ३४ या काळात बांधलेला आहे.[१५] सध्या या ठिकाणी पंचतारांकित हॉटेल आहे. कोल्हापूरला येणाऱ्या पर्यटकाचे हे आकर्षणाचे ठिकाण आहे.

**शिवाजी विद्यापीठ :** कोल्हापूर मधील उच्च शिक्षणाचे मुख्य शैक्षणिक केंद्र आहे. विद्यापीठांची स्थापना इ.स. १९६२ मध्ये करण्यात आली. महाराष्ट्रातील एक अग्रगण्य शैक्षणिक केंद्र म्हणून नावा रूपाला आलेले आहे. प्रशस्त अशा परिसरात असलेल्या या विद्यापीठास अनेक पर्यटक भेट देतात. २००५ मध्ये या ठिकाणी 'वि.स.खांडेकर स्मृती संग्रहालय' निर्माण करण्यात आलेले आहे. त्यामुळे विद्यापीठात येणाऱ्या शैक्षणिक सहलीची संख्या वाढलेलेली आहे.

. **न्यू पॅलेस :** कोल्हापूर शहरातील अतिशय देखणी व सुंदर वास्तु म्हणून प्रसिध्द आहे. 'इंडो-सार्सेनिक' शैलीतील ही वास्तु राजर्षी शाहुंच्या वास्तव्याने पुणित झालेली आहे. या मध्ये शहाजी छत्रपतीनी इ.स.१९७४ मध्ये वस्तुसंग्रहालय स्थापन केले.[१६] कोल्हापूरच्या पर्यटन विकासातील हा एक महत्वाचा स्त्रोत आहे.

**टॉऊन हॉल :** कोल्हापूर मधील 'गॉथिक' शैलीत बांधलेली पहिली वास्तु आहे. अतिशय सुंदर व हिरव्या गर्द बागेत असलेल्या या वास्तुत १९४६ मध्ये वस्तुसंग्रहालय निर्माण करण्यात आले.[१७] कोल्हापूरात येणारे पर्यटक या ठिकाणाला आर्वजून भेट देतात.

याशिवाय कोल्हापूर शहरामध्ये इतर काही पर्यटन स्थळे आहेत यामध्ये कुस्तीचे खासबाग मैदान, बाबु जमाल दर्गा, लक्ष्मी विलास पॅलेस इ. ठिकाणे आहेत.

**वस्तुसंग्रहालय व शैक्षणिक भुमिका :** आधुनिक शिक्षण पध्दतीत व शिक्षणाच्या माध्यमात झपाटयाने बदल होत चाललेला आहे. यामध्ये दृक-श्राव्य माध्यमाला अधिक महत्व प्राप्त झालेले आहे. ज्या गोष्टी अनेक प्रकारे समजावून देखील समजत नाहीत तीच गोष्ट डोळ्यासमोर आल्याबरोबर चटकन आकलन होण्यास मदत होते. चित्रपट, दूरदर्शन प्रमाणे वस्तुसंग्रहालय हे लहान मुले, विद्यार्थी किंवा अशिक्षित लोकांच्यासाठी शिक्षणाचे प्रभावी माध्यम आहे. वस्तुसंग्रहालय अशी एक संस्था आहे की, जिथे सर्व गटातील पर्यटक आपले ज्ञान संवर्धन स्वत: तेथील वस्तू पाहून करू शकतात. विद्यार्थी शालेय पाठ्यपुस्तके वाचून जे ज्ञान आत्मसात करू शकत नाहीत ते

प्रत्यक्ष अनुभवातून आत्मसात करू शकतात. छोट्या-छोट्या सूचना देऊन इतिहास, संस्कृती व कला यांचा परिचय व कला चेतनेचा प्रसार व त्यांचा अभ्यास करण्याची प्रेरणा निर्माण होण्यास मदत होऊ शकते.[१८] वस्तुसंग्रहालयात प्रदर्शित केलेल्या शिल्पाकृती, चित्राकृती, अलंकार, पोषाख, शस्त्रास्त्रे, भांडी, उत्खनीत पुरातत्वीय वस्तूच्या माध्यमातून तत्कालिन सामाजिक व सांस्कृतिक इतिहासाविषयी माहिती मिळण्यास उपयोग होतो. संग्रहालय कलेचा इतिहास शिकवणारी संस्था आहे. कारण प्रदर्शित कलाकृती व भेट देणाऱ्या पर्यटकात थेट संवाद साधला जातो.

कोल्हापूरातील वस्तुसंग्रहालयातून कोल्हापूरच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक जीवनाचे अवशेष संवर्धित करून ठेवले आहेत. शिल्पकला, चित्रकला, हस्तकला, साहित्य, पोषाख अलंकार, भांडी, छायाचित्रे यातून तत्कालिन जीवनाचे यथार्थ दर्शन घडते. या वस्तुसंग्रहालयातून खालील शैक्षणिक उद्दिष्ट साध्य होऊ शकतात.

१) ब्रह्मपूरी उत्खननातील उत्खनीत पुरातत्वीय वस्तुमुळे कोल्हापूरची प्राचीनता व रोमन साम्राज्याशी असलेले व्यापारी संबंध आकलन होण्यास मदत होऊ शकते.

२) सातवाहन, शिलाहार, बहामनी व मराठाकालीन वस्तूवरून तत्कालिन सामाजिक परिस्थिती समजण्यास मदत होऊ शकते.

३) शिल्पकला, हस्तकला, चित्रकला, धातुकाम, माती काम यातून कलेचा इतिहास समजण्यास मदत होते.

४) प्रदर्शित चित्रकलाकृतीतून कोल्हापूरमध्ये निर्माण झालेल्या चित्रकला प्रवाहाचे दर्शन होते.

५) 'गॉथिक' व 'इंडो-सार्सेनिक' वास्तुशैलीचे बारकावे अभ्यासण्यास मदत होते.

६) प्राचीन, मुघल, मराठा व ब्रिटिश काळातील शस्त्रास्त्रावरून तत्कालिन युद्धपद्धती व शस्त्रास्त्र तंत्रज्ञानात झालेला विकास समजण्यास मदत होते.

७) मराठ्याचा इतिहास, करवीरचे छत्रपती व राजर्षि शाहू महाराजाचे जीवन व कार्याचे ओझरते दर्शन घडते.

८) वि.स. खांडेकरांचे जीवन व कार्य, साहित्यकृती, त्यांच्या लेखनातील बारकावे पाहता येते व त्यांची प्रत्यक्ष भाषणे ऐकण्याची सोय आहे. यातून त्याचे जीवन दर्शन होण्यास मदत होते.

कोल्हापूर वस्तुसंग्रहालयात इ.स.पू. दुसऱ्या शतकापासून ते मराठा राज्याच्या ऱ्हास काळापर्यंत या भागात कसकशी सांस्कृतिक स्थित्यंतरे होत गेली यावर प्रकाश टाकणाऱ्या अनेक वस्तू प्रदर्शित केल्या आहेत. त्यामुळे हे संग्रहालय विद्यार्थ्यांना शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. शालेय विद्यार्थी आपल्या शिक्षकासह व महाविद्यालयातील विद्यार्थी गटागटानी भेट देतात. बाहेर गावाहून कोल्हापूरात येणाऱ्या शैक्षणिक सहली या संग्रहालयास आवर्जून पाहातात. कला महाविद्यालयात (Art School) शिक्षण घेणारे विद्यार्थी, मूर्तिशिल्प व वास्तूरचनेचा अभ्यास करणारे विद्यार्थी देखील खास अभ्यास करण्यासाठी भेट देतात. या वस्तुसंग्रहालयास भेट देणाऱ्या लहान मुलांची संख्या लक्षणीय आहे. २००१-०२ मध्ये ६,४८६, २००३-०४ मध्ये २३,६८८, २००५ मध्ये २१,४०२, २००६ मध्ये २१,२७५, मे, २००७ पर्यंत १०,००६ इतक्या मुलांनी भेट दिली.[११] मात्र स्थानिक शाळातून केलेल्या सर्वेक्षणातून असे आढळून आले की, काही ठराविक शाळा व महाविद्यालये आपल्या विद्यार्थ्यांना संग्रहालय दाखवण्यासाठी घेऊन येतात. प्राथमिक व माध्यमिक शाळामधील पहिली ते चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहल म्हणून कोल्हापूरातील इतर स्थळाबरोबर संग्रहालये दाखवतात. तर महाविद्यालयामध्ये अध्यापक व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सहली येतात. स्थानिक नागरिकांचाही अल्पप्रतिसाद आहे ही फार खेदाची बाब म्हणावी लागेल. चटपटीत मनोरंजनासाठी तीन तासाला ५० ते १०० रुपये पर्यंत तिकिट काढून चित्रपटगृहात गर्दी करतात. मात्र हजारो वर्षाचे सांस्कृतिक वैभव पहायला येणाऱ्यांची संख्या मात्र अल्प आहे.

न्यू पॅलेस मध्ये शालेय विद्यार्थ्यांना राजर्षि शाहू महाराजांच्या लहानपणापासूनचे दुर्मिळ प्रसंग, वेगवेगळ्या प्रकारची शस्त्रास्त्रे, विविध पशु-पक्षी पहायला मिळतात. यामधून विद्यार्थ्यांचे शस्त्रास्त्राचे व पशु-पक्षाचे ज्ञान वृद्धींगत होण्यास मदत होते. शिवाजी विद्यापीठातील वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय शालेय विद्यार्थ्यांसाठी फारच उद्‌बोधक आहे. एका साहित्यिकाचे समग्र व साक्षेपाने होणारे दर्शन, त्यांची जीवन शैली, लिखाण करण्याची पद्धत, टिपण काढण्याची पद्धत, त्यांनी लिहिलेली पुस्तके,दुर्मिळ छायाचित्रे, त्यांना मिळालेले पुरस्कार प्रदर्शित केलेले आहेत. त्यामुळे एक साहित्यिक कसा घडत जातो याचे दर्शन घडते. यातून विद्यार्थ्यांना लिखाण, वाचन करण्याची प्रेरणा मिळू शकते. याठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटनांची संख्या देखील जास्त आहे.

**पर्यटक सर्वेक्षण :**

कोल्हापूर शहरामध्ये अनेक पर्यटन स्थळे आहेत. प्रस्तुत उपघटकामध्ये संशोधन विषयाला अनुसरुन कोल्हापूर वस्तुसंग्रहालय, शहाजी छत्रपती वस्तुसंग्रहालय (न्यू पॅलेस) व वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय या ठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटकांकडून प्रश्नावली व मुलाखतीच्या माध्यमातून पर्यटकांची वैयक्तिक माहिती व तेरा प्रश्नांला अनुसरुन माहिती भरून घेतली. यामध्ये नाव, पत्ता, शिक्षण, वय, व्यवसाय व खालील तेरा प्रश्नांचा समावेश होता.

१) पर्यटन करणे (फिरायला जाणे) हा तुमचा छंद आहे का ? होय/नाही

२) वस्तुसंग्रहालय ही संकल्पना तुम्हाला माहित आहे का ? होय/नाही

३) कोल्हापूरमधील वस्तुसंग्रहालयांचे पर्यटन क्षेत्रात स्थान आहे का ? होय/नाही

४) कोल्हापूरमध्ये तुम्ही फक्त संग्रहालये पाहण्यासाठीच आलात का ? होय/नाही

५) कोल्हापूरला भेट देण्याचा तुमचा कोणता हेतू होता ?

अ) देवदर्शन व स्वकियांना भेटणे, ब) व्यापार व व्यवसाय

क) मनोरंजन व सुट्टीचा आनंद घेणे, ड) शैक्षणिक

६) कोल्हापूरला येण्यासाठी कोणत्या वाहनाचा वापर केला ?

अ) रेल्वे ब) विमान क) एस्.टी. बस ड) इतर

७) कोल्हापूरमध्ये तुमचा किती दिवसांचा मुक्काम आहे ?

अ) नाही ब) एक दिवस क) दोन दिवस ड) सांगता येत नाही

८) कोणत्या कारणासाठी तुम्ही या वस्तुसंग्रहालयास भेट दिली ?

अ) शैक्षणिक ब) सांस्कृतिक क) ऐतिहासिक ड) नुसते पाहणे

९) कोल्हापूरमधील कोण-कोणत्या ठिकाणांना तुम्ही भेट देणार आहात किंवा दिलेली आहे ?

१०) कोल्हापूरमधील किती संग्रहालये तुम्हाला माहित आहेत ?

११) या वस्तुसंग्रहालयातील तुम्हाला आवडलेली वस्तू कोणती ?


१२) कोल्हापूरमध्ये तुम्हाला कोणत्या प्रकारच्या अडचणी आल्या ? त्याबाबत सूचना.

१३) तुम्हाला या वस्तुसंग्रहालयाबद्दल काय वाटते ?

वरील प्रश्नांना अनुसरुन पर्यटकांकडून भरून घेतलेल्या एकूण प्रश्नावलीपैकी पूर्ण व अचूक भरलेल्या शंभर पर्यटकांच्या प्रश्नांवलीवर आधारीत खालील निष्कर्ष काढलेले आहेत.

पर्यटन करणे (फिरायला जाणे) यासाठी वयाची मर्यादा राहत नाही. सर्व वयोगटातील व्यक्ती स्वत:च्या कुवतीप्रमाणे कमी-जास्त प्रमाणात भटकंती किंवा पर्यटन करत असतात. हे जरी खरे असले तरी काही ठराविक वयोगटातील व्यक्तीची पर्यटनास जाण्याची संख्या अधिक आहे. हे खालील स्तंभलेखातून आपणास दिसून येते.

## आलेख क्र. १





प्रमाण : १ से.मी. = १० टक्के

सूची : वयोगट - १) १ ते १० २) १० ते २० ३) २० ते ३० ४) ३० ते ४०
५) ४० ते ५० ६) ५० च्या पुढे

१ ते ३० या वयोगटातील पर्यटकांची संख्या ६४ टक्के आहे. मात्र १ ते ३० या वयोगटामध्ये ३५ टक्के पर्यटक २० ते ३० या वयोगटातील, १९ टक्के पर्यटक १० ते २० या वयोगटातील आहेत. तर ३० ते ५० या वयोगटातील पर्यटकांची संख्या ३६ टक्के इतकी आहे. या वयोगटामध्ये देखील २६ टक्के पर्यटक ३० ते ४० या वयोगटातील आहेत. म्हणजे एकूण पर्यटकांच्या पैकी ८० टक्के पर्यटक तरुण वयोगटातील, १० टक्के पर्यटक लहान वयोगटातील व १० टक्के पर्यटक मध्यम वयोगटातील आहेत.

आधुनिक काळातील शिक्षण व शैक्षणिक विस्तारामुळे पर्यटनाची व्यापकता वाढलेली आहे. कारण वस्तुसंग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांच्या सर्वेक्षणानुसार ९६ टक्के पर्यटक हे विद्यार्थी व सुशिक्षित वर्गातील आहेत हे खालील स्तंभालेखातून स्पष्ट होते.

**आलेख क्र.२**





प्रमाण : १ से.मी. = १० टक्के

सूची : शिक्षण गट – १) पहिली ते दहावी २) दहावी ते पदवी ३) पदवी ते पदव्युत्तरच्या पुढे ४) अशिक्षित

९६ टक्के पर्यटकांच्या मध्ये २८ टक्के पर्यटक पहिली ते दहावी, ३३ टक्के पर्यटक दहावी ते पदवी व ३५ टक्के पर्यटक पदवी ते पदव्युत्तर या शैक्षणिक गटातील आहेत. तर ४ टक्के पर्यटक अशिक्षित आहेत, यामध्ये शेतकरी व ग्रामीण भागातील स्त्रियांचा समावेश अधिक आहे. या ९६ टक्के सुशिक्षित पर्यटकांच्या पैकी २३ टक्के पर्यटक हे विद्यार्थी आहेत. म्हणजे ९६ टक्के सुशिक्षित पर्यटकांच्या पैकी २६ टक्के पर्यटकांचे शिक्षण चालू आहे असे खालील स्तंभालेखातून दिसून येते.

### आलेख क्र. ३




प्रमाण : १ से.मी. = १० टक्के


सूची : व्यवसाय गट - १) शिक्षण २) नोकरी ३) शेती ४) इतर व्यवसाय ५) निवृत्त नोकदार

वस्तुसंग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांच्या व्यवसायाचा विचार केल्यास वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, २६ टक्के पर्यटक हे शिक्षण घेणारे आहेत, ४० टक्के पर्यटक नोकरी करणारे, १० टक्के पर्यटक शेती करतात. १५ टक्के पर्यटक इतर व्यवसाय व १२ टक्के पर्यटक निवृत्त नोकरदार आहेत. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की,पर्यटन हा आर्थिक घटकाशी निगडीत असल्याने यामध्ये सर्वाधिक संख्या नोकरदार वर्गाची आहे.

कोल्हापूर सध्या जिल्ह्याचे मुख्य ठिकाण व धार्मिक, शैक्षणिक, औद्योगिक, व्यापार व व्यवसाय, पर्यटन व बाजारपेठेचे केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. त्यामुळे कोल्हापूरला वेगवेगळ्या कारणासाठी किंवा उद्देशाने येणाऱ्या व्यक्तीची संख्या जास्त आहे. मात्र कोल्हापूरला येणाऱ्या सर्वच व्यक्ती पर्यटक आहेत किंवा त्या संग्रहालय पाहण्यासाठी येतात असे मात्र नाही. कोल्हापूरला येण्याचा उद्देश वेगवेगळा असतो. मात्र मिळालेल्या मोकळ्या वेळेमध्ये काही व्यक्ती त्यांच्या आवडीनुसार त्यांना माहित असलेल्या पर्यटन स्थळांना भेट देतात. यामध्ये संग्रहालयांचा समावेश होतो. यामध्ये केवळ पर्यटक व

मनोरंजन व सुट्टीचा आनंद घेण्यासाठी आलेल्या पर्यटकांची संख्या १७ टक्के आहे. हे खालील आकडेवारीवरून स्पष्ट होते.

**आलेख क्र.४**




प्रमाण : १ से.मी. = १० टक्के

सूची : १) देवदर्शन व स्वकियांना भेटणे २) व्यापारव व्यवसाय ३) मनोरंजन व सुट्टीचा आनंद घेणे ४) शैक्षणिक ५) एक व तीन दोन्ही ६) तीन व चार दोन्ही

कोल्हापूरला भेट देण्याचा उद्देश जरी वेगवेगळा असला तरी ज्यांनी संग्रहालयांना भेट दिली अशामध्ये १३ टक्के पर्यटक देवदर्शन व स्वकियांना भेटण्यासाठी आलेले होते, तर ८ टक्के व्यापार व व्यवसाय, १७ टक्के केवळ मनोरंजन व सुट्टीचा आनंद घेणे, २४ टक्के पर्यटक शैक्षणिक कारणासाठी आलेले होते. तर मनोरंजन व सुट्टीचा आनंद घेणे व शैक्षणिक या दोन्ही कारणासाठी आलेल्यांची संख्या ४१ टक्के इतकी आहे. वरील संख्येवरून असे दिसून येते की, कोल्हापूरला येणाऱ्या सर्वच व्यक्ती पर्यटनासाठी येत नाही त्यांचा कोल्हापूरला येण्याचा उद्देश वेगवेगळा आहे. देवदर्शन व स्वकियांना भेटणे, मनोरंजन व सुट्टीचा आनंद घेण्यासाठी येणारे पर्यटक त्यांना माहित असलेल्या संग्रहालयांना भेट देतात मात्र इतर उद्देशाने आलेल्या व्यक्ती मिळालेल्या मोकळ्या वेळेमध्ये काही प्रमाणात वस्तुसंग्रहालयांना भेट देतात.


**कोल्हापूर पर्यटन विकासात संग्रहालयाचे स्थान :**

कोल्हापूर हे धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक दृष्टीकोणातून महत्वाचे व औद्योगिक क्षेत्रात चौफेर विस्तारलेले शहर पारंपारिक वैशिष्ट्यासह आधुनिकीकरणाची साथ संगत करत सध्या पर्यटन केंद्र म्हणून भारताच्याच नव्हे तर जगाच्या पर्यटन नकाशावर आलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ [२०] (एम.टी.डी.सी.) व स्थानिक स्वराज्य संस्था गेल्या अर्धदर्शकापासून अधिक विकासासाठी प्रयत्नशील असलेल्या दिसून येतात. या प्रयत्नाचा एक भाग म्हणजे केंद्र सरकारच्या पर्यटन व सांस्कृतिक मंत्रालयाने सात कोट रूपायांचा ''कोल्हापूर जिल्हा विकास आराखडा'' मंजूर करून निधी उपलब्ध करून दिलेला आहे.[२१] यामध्ये कोल्हापूरच्या पर्यटन विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असलेल्या न्यू पॅलेस संग्रहालयासाठी (शहाजी छत्रपती वस्तुसंग्रहालय) दोन कोटी चोवीस लाख रुपये संग्रहालय विकासासाठी मंजूर केलेले आहेत. हे जरी खरे असले तरी खरोखरच या संग्रहालयांचे पर्यटन विकासात महत्त्व किंवा भूमिका आहे का ? आहे तर कोणत्या दृष्टिकोणातून किंवा कारणासाठी हा प्रश्न महत्त्वाचा आहे. या दोन्ही प्रश्नास अनुसरुन भेट देणाऱ्या पर्यटकांच्या अभिप्रायांचा किंवा प्रतिक्रियांचा जर विचार केला तर उत्तर आहे असे निघते. कारण भेट देणाऱ्या पर्यटकांच्या प्रश्नावलीच्या सर्वेक्षणावरून व पर्यटकांच्या मुलाखतीतून ९८ टक्के पर्यटकांनी या संग्रहालयांचे पर्यटन क्षेत्रात व विकासात स्थान आहे असा अभिप्राय दिलेला आहे. म्हणजे संग्रहालय स्थापनेचे उद्दिष्ठ काही प्रमाणात यशस्वी झाले असेच म्हणावे लागते.

संग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांच्या पैकी ९६ टक्के पर्यटक सुशिक्षित आहेत व संग्रहालय म्हणजे नेमके काय ? म्हणजे संग्रहालयाची संकल्पना (Concept) त्यांना माहित आहे अशा पर्यटकांची संख्या ८२ टक्के आहे. तर १८ टक्के पर्यटकांना संग्रहालयाची संकल्पना माहित नाही. यामध्ये लहान मुले, शेतकरी, काही प्रमाणात व्यवसाय करणाऱ्या पर्यटकांची संख्या अधिक आहे. म्हणजे संग्रहालय म्हणजे नेमके काय त्याचे महत्त्व अजून खालच्या स्तरापर्यंत किंबहुना ग्रामिण भागापर्यंत पोहोचलेले दिसत नाही. असाच निष्कर्ष

निघतो. याशिवाय केवळ वस्तुसंग्रहालय पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या फक्त ४ टक्के इतकी आहे. यामध्ये छायाचित्रकार, चित्रकार, विद्यार्थी व संशोधक व वास्तुरचनाकार यांचा समावेश आहे तर ९६ टक्के पर्यटक वरती उल्लेख केलेल्या विविध कारणांसाठी कोल्हापूरला येतात व मिळालेल्या मोकळ्या वेळेत माहित असलेल्या संग्रहालयांना वेगवेगळ्या दृष्टिकोणातून भेट देतात. हे खालील टक्केवारीवरून दिसून येते.

**आलेख क्र. ५**




प्रमाण : १ से.मी. = १० टक्के

सूची : १) शैक्षणिक २) सांस्कृतिक ३) ऐतिहासिक ४) नुसते पाहणे

वरील टक्केवारीवरून असे दिसून येते की, ४१ टक्के पर्यटकांनी ऐतिहासिक कारणाने किंवा उद्देशाने पाहिले आहे, म्हणजे भेट देणाऱ्या पर्यटकांच्या मनात कोल्हापूरचा इतिहास जाणून घेण्याची उत्सुकता दिसून येते. कारण या संग्रहालयात संवर्धित केलेल्या प्राचीन वस्तु, शिल्पाकृती, शस्त्रास्त्रे,भांडी, राजर्षि शाहू महाराजांच्या जीवनातील दुर्मिळ प्रसंग व कोल्हापूरातील चित्रकारांच्या दुर्मिळ चित्रकलाकृती आवडल्याचा अभिप्राय नोंदविलेला. याशिवाय १८ टक्के पर्यटकांनी सांस्कृतिक कारणासाठी म्हणजे कोल्हापूरची संस्कृती कशी होती हे या संग्रहालयाच्या माध्यमातून जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तर २५ टक्के पर्यटक

शैक्षणिक कारणासाठी किंवा शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून या संग्रहालयास भेट देतात यामध्ये विद्यार्थ्यांचा प्रामुख्याने समावेश आहे. मात्र नुसते पाहणे म्हणजे त्यांचा संग्रहालयास भेट देण्याचा कोणतेही उद्दिष्ट किंवा हेतू नाही. केवळ नुसते पाहणे अशा पर्यटकांची संख्या १६ टक्के आहे.


कोल्हापूर हे जिल्ह्याचे ठिकाण, व्यापारी, औद्योगिक व शैक्षणिक ठिकाण असल्याने कोल्हापूरमध्ये येणाऱ्या व्यक्तीची संख्या न मोजता येणारी आहे. मात्र केवळ पर्यटनासाठी कोल्हापूरात येणाऱ्या पर्यटकांची संख्या लाखोत आहे. पन्हाळगड हे कोल्हापूरातील पर्यटनाचे मुख्य केंद्र आहे. या ठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येवर वार्षिक पर्यटकांची संख्या मिळते ती अशी, २००४ मध्ये ५,४२,००० पर्यटक, २००५ मध्ये ५,२५,००० व २००६ मध्ये ५,०७,००० पर्यटकांनी भेट दिली.[२२] पर्यटकांची ही संख्या केवळ पन्हाळगडापूरती नाही तर पन्हाळगडाला भेट देणारे पर्यटक जोतिबा, रंकाळा, महालक्ष्मी मंदिर या ठिकाणांना देखील भेट देतात. मात्र वरील पर्यटकांची संख्या व न्यू पॅलेस, टॉऊन हॉल व वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय या ठिकाणी भेट देणाऱ्या पर्यटकात तफावत आहे. न्यू पॅलेस संग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या दर दिवशी सरासरी ५०० इतकी ग्राह्य धरली तरी १,६०,००० वरती जात नाही. तर कोल्हापूर वस्तुसंग्रहालयाला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या लाखाच्या आतच आहे. ती अशी आहे,

| वर्ष | पर्यटकांची संख्या | | |
|---|---|---|---|
| | प्रौढ | लहान | एकूण |
| २००१-०२ | ४८२७७ | २६४८६ | ७४७६४ |
| २००३-०४ | ८०५१६ | ३६८८ | ८४१९४ |
| २००६ | ५३५११ | ३१७७५ | ८४७८६ |
| मे २००७ अखेर | २१९४३ | १०००६ | ३१९४५ |

शिवाजी विद्यापीठात दहा लाख रुपये खर्च करून बांधलेले वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय विद्यापीठ पातळीवरील एक अभिनव प्रयोग आहे. विद्यापीठात दररोज

येणाऱ्यांची संख्या पाहाता संग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या अल्प आहे. २००६ ते मे, २००७ या काळात ६४१२ पर्यटकांनी संग्रहालयास भेट दिली. यामध्ये ३८५४ लहान मुलांचा समावेश होता.[२३] कोल्हापूरातील संग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येचा विचार केल्यास कोल्हापूरला येणारे एकूण पर्यटक व संग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत तफावत आढळते. याच्या पाठीमागे अनेक कारणे आहेत. यामधील मुख्य व महत्त्वाचे म्हणजे संग्रहालय प्रशासनाकडे व्यवसायिकतेचा अभाव आहे. त्यामुळे संग्रहालयाची पाहिजे तेवढी जाहिरात केली जात नाही, त्यामुळे संग्रहालयांना प्रसिद्धी नाही. शहरातील मुख्य पर्यटन स्थळांच्या ठिकाणी मार्गदर्शक फलक नाहीत. त्यामुळे कोल्हापूरात येणाऱ्या पर्यटकांना पर्यटनस्थळांची माहिती म्हणजे संग्रहालयांची माहिती मिळत नाही. त्यामुळे कोल्हापूरात किती संग्रहालये आहेत व कोठे आहेत याबाबत माहिती होत नाही. हे खालील आकडेवारीवरून दिसून येते.

**आलेख क्र. ६**




प्रमाण : १ से.मी. = १० टक्के


सूची : १) टाऊनहॉल २) न्यू पॅलेस ३) चंद्रकांत मांडरे आर्ट गॅलरी ४) वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय ५) एक व दोन दोन्ही ६) एक, दोन व तीन संयुक्त ७) एक व तीन ८) एक, दोन व चार ९) एक ते चार सर्व

सर्वेक्षण केलेल्या पर्यटकापैकी केवळ कोल्हापूर वस्तुसंग्रहालय (टाऊन हॉल), शहाजी छत्रपती वस्तुसंग्रहालय (न्यू पॅलेस), वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय माहित असणाऱ्या पर्यटकांची संख्या क्रमश:१९ टक्के, २३ टक्के, ५ टक्के, ४ टक्के इतकी आहे. टॉऊन हॉल व न्यू पॅलेस ही दोन्ही संग्रहालये माहित असणाऱ्या पर्यटकांची संख्या २० टक्के होते. तर टाऊन हॉल, न्यू पॅलेस, चंद्रकांत मांडरे आर्ट गॅलरी ही तिन्ही संग्रहालय माहित असलेल्या पर्यटकांची संख्या ५ टक्के होते. टॉऊन हॉल व मांडरे आर्ट गॅलरी माहित असलेल्यांची संख्या ३ टक्के, टॉऊन हॉल, न्यू पॅलेस व वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय माहित असलेल्या पर्यटकांची संख्या १४ टक्के व सर्वच संग्रहालये माहित असणाऱ्या पर्यटकांची संख्या ७ टक्के आहे. यावरून असे दिसते की, सर्वेक्षण केलेल्या एकूण पर्यटकापैकी ६५ टक्के पर्यटकांना टॉऊन हॉल संग्रहालय माहित आहे, ६९ टक्के पर्यटकांना न्यू पॅलेस, २५ टक्के पर्यटकांना चंद्रकांत मांडरे आर्ट गॅलरी, २५ टक्के पर्यटकांना वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय माहित आहे. म्हणजे इ.स. १९४६ रोजी स्थापन झालेले टॉऊन हॉल संग्रहालय अजूनदेखील ३५ टक्के लोकांना माहित नाही. इ.स. १९७४ ला स्थापन झालेले न्यू पॅलेस ३१ टक्के लोकांना माहित नाही. तर चंद्रकांत मांडरे व वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय ७५ टक्के पर्यटकांना माहितच नाही. यावरून प्रशासनाची उदासिनता दिसून येते.

**वाहतूक सुगमता पर्यटन विकास :** पर्यटन स्थळ कितीही आकर्षक व महत्त्वाचे असले तरी वाहतूकीच्या सुगमते (Accessibillity) शिवाय त्या स्थळाचा फारसा विकास होत नाही.[२४] त्यामुळे वाहतूकीच्या सुगमतेला पर्यटन विकासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. किंबहुना असेही म्हणता येईल की, सध्याच्या काळात जो पर्यटन विकास झालेला आहे तो वाहतुकीच्या साधनाच्या उपलब्धतेमुळे झालेला आहे. त्यामुळे कोल्हापूरचे भौगोलिक स्थान व वाहतूकीच्या सुविधा पाहता पर्यटन विकासातील तो महत्त्वाचा घटक आहे. कारण कोल्हापूर रस्ते, लोह व हवाई मार्गाद्वारे भारतातील विविध राज्यांना व राज्यातील प्रमुख मार्गाशी जोडले गेलेले आहे. याचा फायदा पर्यटनासाठी व त्याद्वारे पर्यटन

विकासाला झालेला दिसतो. कोल्हापूरला भेट देणाऱ्या पर्यटकांच्या सर्वेक्षणातून असे दिसते की, पर्यटक तिन्ही मार्गाचा कमी-जास्त प्रमाणात वापर करतात हे खालील संख्येवरून दिसून येते.

**आलेख क्र. ७**




प्रमाण : १ से.मी. = १० टक्के

सूची : १) रेल्वे २) विमान ३) एस्.टी. ४) इतर ५) एक व तीन दोन्ही

यामध्ये एस्.टी. ने येणाऱ्या पर्यटकांची संख्या सर्वाधिक म्हणजे ४६ टक्के इतकी आहे. कारण एस्.टी.ची सुविधा ग्रामिण भागापासून ते जिल्हा पातळीपर्यंत उपलब्ध आहे व सर्वसामान्य पर्यटकांना परवडणारे तिकिट दर आहेत. उदा. कोल्हापूर-मुंबई एस्.टी. बस भाडे ३८५ रुपये आहे. रेल्वे मार्गाचा वापर करणाऱ्या पर्यटकांची संख्या २६ टक्के आहे. रेल्वेचे देखील तिकीट सर्वसामान्य पर्यटकांना परवडणारे आहेत. उदा. कोल्हापूर-मुंबई रेल्वे भाडे २३०रुपये ते ५६० रुपये पर्यंत आहे. मात्र रेल्वेचे जाळे तितकेसे विस्तृत नाही. काही ठराविक ठिकाणाहूनच रेल्वे मार्गाची उपलब्धता आहे. कोल्हापूरला हवाई मार्गाची सुविधा आहे. मात्र त्याचे तिकिट तर सर्वसामान्य पर्यटकांच्या खिशाला पेलवणारे नाहीत. उदा. कोल्हापूर-मुंबई विमान भाडे २००० ते २२०० पर्यंत आहे. त्यामुळे या मार्गाचा वापर करणाऱ्या पर्यटकांची संख्या अत्यल्प म्हणजे ३ टक्के आहे. तर इतर वाहनांचा वापर

करणाऱ्या पर्यटकांची संख्या ३५ टक्के इतकी आहे. यामध्ये खाजगी पर्यटन सहली आयोजित करणाऱ्या संस्थांच्या गाड्या, पर्यटकांच्या स्वत:च्या किंवा भाड्याच्या गाड्याचा वापर करतात.

कोल्हापूर रस्तेमार्गाद्वारे महाराष्ट्रातील व विविध राज्यातील मुख्य शहरांशी जोडलेले आहे. याशिवाय कोल्हापूरवरून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार जातो. त्यामुळे रस्ते मार्गाचा विकास झालेला आहे. या मार्गाचा वापर करणाऱ्या पर्यटकांची संख्या ६१ टक्के इतकी आहे. कोल्हापूरला इ.स. १८९५ मध्ये राजर्षि शाहू महाराजांच्या प्रयत्नाने रेल्वे सेवा सुरु झाली. सध्या कोल्हापूरमधून अनेक प्रवाशी गाड्या ये-जा करतात. यामध्ये 'कोल्हापूर-बेंगलोर राणी चेन्नमा एक्स्प्रेस', 'कोल्हापूर-मुंबई कोयना एक्स्प्रेस', 'कोल्हापूर-महालक्ष्मी एक्स्प्रेस', 'कोल्हापूर-मुंबई कोयना एक्स्प्रेस', 'कोल्हापूर-गोंदिया महाराष्ट्र एक्स्प्रेस', 'कोल्हापूर-तिरुपती हरिप्रिया एक्स्प्रेस' इत्यादीचा समावेश आहे. याशिवाय महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, भारतीय रेल्वे मंत्रालय व 'एअर इंडिया' यांच्या प्रयत्नातून सुरु झालेली 'डेक्कन ओडिशी' ही वातानुकुलीत शाही रेल्वे कोल्हापूरला येते. या रेल्वे गाडीतून आतापर्यंत ५८६ पर्यटकांनी कोल्हापूरला भेट दिलेली आहे.[२५] यामध्ये अमेरिका, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, चीन, कॅनडा, न्यूझीलंड इत्यादी देशातील पर्यटकांची संख्या अधिक आहे. या गाडीतून येणाऱ्या पर्यटकांना महालक्ष्मी मंदिर, न्यू पॅलेस संग्रहालय, रंकाळा इत्यादी पर्यटन स्थळे दाखवली जातात. न्यूझीलंडमधील प्रा. डॉ. डेन्सी केर्सल म्हणतात, कोल्हापूरमधील स्थापत्य व सांस्कृतिक वैभव पाश्चिमात्यासाठी कल्पनातीत आहे.[२६] त्यामुळे आपणास असे म्हणता येईल की, 'डेक्कन ओडिसी'मुळे कोल्हापूरच्या पर्यटन विकासाच्या कडा रुंदावण्यास मदत झाली आहे.

कोल्हापूरमध्ये अंतर्गत वाहतूकीची सुविधाही मुबलक आहे. कोल्हापूर महानगरपालिकेच्या परिवाहन विभागामार्फत प्रवाशी गाड्यांची सेवा 'केएमटी' मार्फत पुरवली जाते. याप्रवाशी गाड्या कोल्हापूरमधील सर्व पर्यटन स्थळापर्यंत जातात. नवरात्र व गणपती उत्सवाच्या काळात 'कोल्हापूर दर्शन' म्हणून खास गाड्यांची सोय पुरवली जाते.

याचा फायदा कोल्हापूरला येणाऱ्या पर्यटकांना होतो. 'केएमटी' मार्फत खास सवलतीच्या दरात 'पास योजना' आहे. याचा दर फक्त २० रुपये इतका आहे. या पास द्वारे पर्यटक संपूर्ण कोल्हापूर पाहू शकतात. त्यामुळे कोल्हापूरमधील पर्यटन विकासता हा एक प्रेरक घटक आहे.

**पर्यटकांच्या संग्रहालयाबद्दल प्रतिक्रिया व सूचना :** कोल्हापूरातील विविध संग्रहालयांना पर्यटक भेट देतात. हे पर्यटक संग्रहालय पाहून झाल्यानंतर जमल्यास आपला अभिप्राय नोंद करतात. या पर्यटकांच्या प्रतिक्रिया महत्त्वाच्या आहेत. कारण संग्रहालयाबद्दल पर्यटकांच्या मनात कोणत्या भावना आहेत किंवा संग्रहालयाबद्दल काय वाटते याच्या बोलक्या प्रतिक्रिया व सूचना पहावयास मिळतात. कांही पर्यटकांनी संग्रहालयाबद्दल स्तुती सुमने उधळलेली दिसतात तर काहींनी संग्रहालयाच्या विकासासंबंधी किंवा संग्रहालयातील त्रूटी संबंधी सूचना केलेल्या दिसतात. याशिवाय संग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांच्या कडून प्रश्नावलीच्या माध्यमातून अभिप्राय घेतले त्यामध्ये देखील पर्यटकांनी अमूल्य अशा सूचना केलेल्या आहेत. या सूचनांचा विचार करणे महत्त्वाचे आहे. कारण त्या भावी काळात संग्रहालय विकास व पर्यटन विकासात अडथळा ठरू शकतात.

इ.स. १९८९ पासून कोल्हापूर वसतुसंग्रहालयामध्ये पर्यटक अभिप्राय नोंदवही उपलब्ध आहे, मात्र ती सर्वसामान्य पर्यटकांच्यासाठी उपलब्ध होत नाही. हे जरी खरे असले तरी यामधील नोंदलेल्या प्रतिक्रिया तितक्याच बोलक्या व मार्गदर्शक आहेत. या प्रतिक्रियाचा किंवा अभिप्रायाचा त्यामध्ये दिलेल्या सूचनांचा संग्रहालय प्रशासनाने कितपत फायदा करून घेतला आहे याचे उत्तर अनुत्तरीत आहे. 'प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम'चे तत्कालिन संचालक सदाशिव गोरक्षकर दिनांक ११ एप्रिल, १९८९ च्या भेटीत लिहितात, "स्थानिक इतिहासावर आणि कलाकुसरीवर भर देऊन या संग्रहालयाचा विकास करणे शक्य आहे. कोल्हापूर चित्रकलेचे प्रमुख केंद्र होत. त्याचं संपूर्ण प्रदर्शन फार मोठ्या प्रमाणात व्हायला हवं."[२७] गोरक्षकर यांची ही अपेक्षा काही प्रमाणात साध्य झाल्याची

दिसते. कारण सध्या संग्रहालयात कोल्हापूरातील नामवंत चित्रकारांच्या चित्रकलाकृती दोन स्वतंत्र दालनामध्ये प्रदर्शित केलेल्या आहेत.

नवी दिल्लीहून आलेले अनंत माणकापुरे लिहतात, ''आज संग्रहालय पहाण्याचा योग आला. या कलानगरीत आणखी एका वैशिष्ट्यपूर्ण संग्रहालयाची आवश्यकता आहे. कलाकृतीची व इतर महत्त्वाच्या वस्तूंची मांडणी अत्यंत कलापूर्ण व आकर्षक वाटली. स्वच्छता वाखानण्यासारखी आहे. कोल्हापूरच्या जून्या कलाकारांच्या कलाकृती पाहून फारच आनंद झाला. तसेच नव्या कलाकारांना सुद्धा योग्य स्थान मिळत आहे हे पाहून समाधान आहे. कोल्हापूरच्या कला व संस्कृतीचे सर्वांगिण दर्शन या संग्रहालयात व्हावे अशी आवश्यकता आहे. शासनाने या संग्रहालयाकडे जर अधिक लक्ष घालून संग्रहालयाच्या आधुनीकीकरणाची योजना हाती घ्यावी व त्यासाठी भरपूर आर्थिक पाठिंबा द्यावा. वैशिष्ट्यपूर्ण मांडणी, प्रकाश योजना, रंगसंगती करून अधिक रंगसंगती करून अधिक आकर्षण निर्माण होईल.'' श्री माणगपुरेनी इ.स. १९८९ मध्ये व्यक्त केलेली अपेक्षा २००७ वर्ष संपत आले तरीही पूर्ण झालेली दिसत नाही. महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विकास महामंडळाने सात कोटी रुपयांचा कोल्हापूर जिल्हा विकास आराखडा मंजूर करून घेतला. मात्र कोल्हापूर वस्तुसंग्रहालयास मात्र यात स्थान दिले नाही. अमूल्य वस्तूनी सजलेली ही इमारत नूतनीकरण करण्याची गरज आहे. प्रदर्शित वस्तूवर योग्य तेवढी विद्युत प्रकाशाची सोय नाही. ज्या दिवशी विद्युत पुरवठा बंद असतो त्या दिवशी संग्रहालयात पर्यटकांना प्रवेश दिला जात नाही. अशा अडचणी असल्या तरी शासनाने मात्र ही वास्तू पर्यटन विकासातून वगळून टाकली.

नाशिकहून आलेले वास्तूरचनाकार विजय दीक्षित म्हणतात, ''कोल्हापूर कलासंग्रहालय बघून अद्भूत कलानंद लाभला. विशेषत: चित्रदालनातील कलाक्रांती अवर्णनीय आनंद देणाऱ्या वाटल्या. त्यातही सुमारे शंभर वर्षातील विविध प्रवाहांना प्रतिनिधित्व दिल्यामुळे चित्रकलेतील प्रगतीचे सम्यक दर्शन झाले. कोल्हापूरातील कलासंपन्न परंपरेचे उत्कटदर्शन झाले. .....या कला वस्तुसंग्रहालयाचे वैशिष्ट्य म्हणजे

श्री पोतदार (तत्कालिन अभिरक्षक) यांनी कल्पक दृष्टीने या वास्तूची सजावट व मांडणी केलेली आहे, ती श्रेष्ठ दर्जाची म्हणावी लागेल. ज्या तळमळीने व रसिकतेने त्यांनी आपल्या कामात यश संपादन केले ते निश्चितच अभिनंदनीय आहे. कोल्हापूरच्या रसिकजनाचा, कलावंतांचाही या कल्पक उभारणीत सहभाग आहे. असे प्रयत्न राज्य व राष्ट्रीय पातळीवर झाल्यास आपल्या पूर्वजाबद्दल अभिमान जागृत करण्यास कारणीभूत होईल व त्यांच्यातील रसिकतेची गोठलेली दृष्टी पुन्हा अभ्यासमन होईल अशी आशा निश्चितच वाटते." २ नोव्हेंबर, १९८९ मध्ये नांदलेला हा अभिप्राय वस्तुसंग्रहालयाचे अभिरक्षक व त्यांनी दाखवलेली तळमळ यांची दखल घेतो. याबाबत औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती भालचंद्र यांचा अभिप्रायदेखील महत्त्वाचा वाटतो. "करवीर संस्थानचा भूतकाळ जाणून घ्यावयाचा असेल तर या संग्रहालयास भेट जरुर आहे. गतवैभव डोळ्यासमोर उभेराहते. अभिरक्षक श्री अमृत पाटील यांनी ऐतिहासिक बारकावे सांगितले. त्यामुळे अनेक बाबीची सखोल माहिती मिळाली. सर्व परिसर स्वच्छ ठेवला आहे. आज स्वच्छता गुटका संस्कृतीमुळे दुर्मिळ झाली आहे."

वरील दोन्ही अभिप्रायामध्ये एक गोष्ट महत्त्वाची आहे ती संग्रहालय अभिरक्षकांची भूमिका महत्त्वाची मानली आहे. सध्या मात्र परिस्थिती वेगळी पहायला मिळते. संग्रहालय अभिरक्षकास संग्रहालयाबद्दल तळमळ नाही. त्यांच्यामध्ये संग्रहालयाबद्दल अनास्था आहे. सर्वेक्षण केलेल्या पर्यटकांच्या सूचनादेखील प्रशासनाच्या त्रूटीवर बोट ठेवतात. संग्रहालयात प्रदर्शित केलेल्या वस्तूंची सविस्तर व योग्य माहिती सांगणारे सूचीफलक नाहीत. भेट देणाऱ्या पर्यटकांना संग्रहालय प्रशासनाकडून मार्गदर्शन होत नाही. अभ्यास व संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना माहितीत दिली जात नाही. कारण संग्रहालय अभिरक्षक अतिरिक्त सरकारी कामाचा बोजा दाखवून दिवसातील बरेच तास बाहेरच असतात. संग्रहालय अभिरक्षकास अतिरिक्त सरकारी काम कोणते ? हा महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण संग्रहालय अभिरक्षक बरेच तास हजर नसतात हे मी स्वत: अभ्यासले आहे. वास्तविक पाहता संग्रहालय अभिरक्षक संग्रहालयाचे बोलके प्रतीक मानले जाते. त्यांच्याकडील

उत्साह, ज्ञान, व्यवस्थापन व जनतेशी संवाद यावरच संग्रहालयाचा विकास अवलंबून असतो. मात्र कोल्हापूर संग्रहालयातील अभिरक्षकांची उदासिनता, अनास्था, अकार्यक्षमता व संशोधक विद्यार्थ्यांना शासनाचा बडगा दाखवून पिटाळले जाणे ही गोष्ट संग्रहालय विकासात अडथळा आणणारी व विचार करायला लावणारी आहे. संग्रहालय प्रशासनाच्या अनास्थेचा परिणाम पर्यटकाच्या संख्येवर झालेला दिसून येतो. संग्रहालयाची व त्यातील वस्तूची कोणतीही माहिती प्रसिद्ध होत नाही. जाहिरात होत नाही. भेट देणाऱ्या पर्यटकांना मार्गदर्शन दिले जात नाही. याचे पडसाद स्थानिक वृत्तपत्रातून देखील उमटलेले दिसते. दैनिक सकाळच्या २६ जुलै, २००६ रोजी 'सजलेल्या संग्रहालयास शुकशुकाटीचीच सोबत' १८ जुलै, २००६ रोजी 'दुर्मिळ वस्तु, पर्यटकही दुर्मिळच' १९ जुलै, २००६ रोजी 'अमूल्य वस्तू असलेली वास्तू जपण्याची गरज', २० एप्रिल, २००७ रोजी 'दिवस उजाडलाही आणि मावळलाही' अशा मथळ्याखाली लेख प्रसिद्ध झालेले आहेत. हे लेख वास्तवतेची जाण करून देतात.

कोल्हापूरचे तत्कालिन महापौर श्री श्यामराव शिंदे यांचा अभिप्राय सध्याच्या संग्रहालय अभिरक्षकांच्या भूमिकेला छेद देणारा आहे. ते म्हणतात, 'अत्यंत प्राचीन कलेचे नमुने कलात्मक दृष्टीने प्रदर्शित केले आहेत. नविन चित्रकलेचे दालन सुरु केलेने प्रतितयश चित्रकारांच्या दुर्मिळ चित्रांचा आनंद उपभोगता येतो. कलाप्रेमी विद्यार्थ्यास संशोधनास या संग्रहालयातून स्फूर्ती व प्रेरणा मिळेल. श्री. पोतदार यांनी व्यक्तिगत लक्ष घातलेने त्यांचे संग्रहालय विषयची प्रेम व निष्ठा दिसून आली.....'

बेळगावहून आलेले के.बी. कुलकर्णी म्हणतात, ''मूळचा मी निराशावादी व जीवन निरर्थक मानणारा आहे. पण म्युझियम पाहून एक प्रकारचा आशावाद अंकुरणार अस वाटलं. श्री. पोतदार यांना हे श्रेय. चित्रकक्षमध्ये चित्रकलेला हा जो मान मिळत आहे तो पाहून आनंद झाला. श्री. पोतदारसारख्या माणसांची संख्या आपल्या या देशात वाढावी हीच त्या परमेश्वराजवळ (आहे की नाही कोण जाणे) प्रार्थना !'' एखाद्या निराशावादी व्यक्तीला जर जीवनवादी व जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन जर देत असेल तर

अशा संग्रहालयांचा नक्कीच विकास व्हायला हवा. या वस्तुसंग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांच्या सर्वेक्षणामधून संग्रहालयासंबंधी त्रूटी आढळल्या आहेत व त्याबद्दल काही पर्यटकांनी महत्त्वपूर्ण सूचना केलेल्या आहेत. सर्वेक्षण केलेल्या एकूण पर्यटकांच्या पैकी ६० टक्के पर्यटकांनी संग्रहालय प्रशासनाकडून संग्रहालयाची माहिती सांगितली जात नाही तरी द्यावी असे सूचवले आहे. १७ टक्के पर्यटकांनी प्रदर्शित वस्तूच्याबद्दल अधिक माहिती लावावी असे सूचविले आहे. संग्रहालय परिसरात स्वच्छ शौचालय व पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी, शिल्पाकृती विभागात विद्युत प्रकाशाची सोय करावी, भेट देणाऱ्या पर्यटकांना संग्रहालयातील वस्तूंचे भेट देण्यासाठीचे तिकिट उपलब्ध व्हावेत असे १३ टक्के पर्यटकांनी सूचविले आहे.

वरील सूचनांचा संग्रहालय प्रशासनाने विचार केला पाहिजे. भेट देणाऱ्या पर्यटकांना पायाभूत सुविधा, संग्रहालयाविषयी माहिती देणे आवश्यक आहे. त्यामुळे पर्यटकांची संख्या वृद्धींगत होण्यास मदत होईल. गोरेगाव मुंबई येथील चित्रनगरीचे मुख्य प्रशासकीय अधिकारी म.ना. लाले यांनी लिहिल्याप्रमाणे, ''करवीर नगरीचे हे वस्तुसंग्रहालय कालांतरांने चंद्राच्या कलेकलेने वाढणाऱ्या पूर्ण चंद्रबिंबासमान एक देखणे शिल्प तयार होईल व तमाम मराठी रसिकांना अभिमान होईल याची मला पूर्ण खात्री आहे.''

कोल्हापूरमधील पर्यटन क्षेत्रात न्यू पॅलेस संग्रहालयाची स्थिती कोल्हापूर वस्तुसंग्रहालयापेक्षा वेगळी आहे. राजर्षि शाहूंचे निवासस्थान म्हणून न्यू पॅलेस संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. त्यामुळे पर्यटन नकाशावर न्यू पॅलेसची प्रसिद्धी आहे. साहजिकच भेट देण्याऱ्या पर्यटकांची संख्या समाधानकारक आहे. या ठिकाणी केलेल्या पर्यटकांच्या सर्वेक्षणातून पर्यटकांनी कांही अभिप्राय व सूचना केल्या आहेत. या सूचना म्हणजे खऱ्या अर्थाने संग्रहालयाच्या त्रुटीच आहेत. या भावी काळात संग्रहालय विकासात अडथळ्याच्या ठरू शकतात. त्यामुळे या सूचनांचा विचार करणे महत्त्वाचे आहे.

न्यू पॅलेस वस्तुसंग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांच्या केलेल्या सर्वेक्षणानुसार ८ टक्के पर्यटकांनी भाषेची अडचण सांगितली. संग्रहालयातील सेवक वर्ग प्रशिक्षित नसून संग्रहालयाबद्दल माहिती देत नाहीत व मराठी दुसरी भाषा त्यांना येत नाही. १८ टक्के पर्यटकांनी संग्रहालय परिसरात स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय नाही, ती करावी असा अभिप्राय नोंदविला. २०टक्के पर्यटकांनी संग्रहालयातील प्रदर्शित वस्तूवर योग्य तेवढी विद्युतप्रकाशाची सोय नाही. त्यामुळे वस्तू दिसत नाहीत. अशी अडचण सांगितली. ७ टक्के पर्यटकांनी संग्रहालय परिसरातील प्राणी संग्रहालयामधील प्राण्याची माहिती लावावी, बसण्यासाठी बाक हवेत व संग्रहालयाकडे येणाऱ्या मार्गावर दिशादर्शक फलक लावावेत असे सुचवले. तर ४७ टक्के पर्यटकांनी संग्रहालय प्रवेश फी जास्त आहे. मात्र त्यामानाने माहिती दिली जात नाही अशी तक्रार केलेली आहे.

न्य पॅलेसचा जर पर्यटन स्थळ म्हणून विकास करावयाचा असेल तर पर्यटकासाठी पायाभूत सुविधा निर्माण केल्या पाहिजेत. कारण वरील पर्यटकांनी केलेल्या सूचना बोलक्या आहेत, संग्रहालयातील सेवकवर्ग प्रशिक्षित नाही. त्यामुळै भाषेची व विचारलेली माहिती त्यांच्याकडून मिळत नाही. प्रदर्शित वस्तूसंबंधी संक्षिप्त माहिती देणे आवश्यक आहे. जेणे करून पर्यटकांना त्या वस्तूबद्दलची माहिती त्याचे महत्त्व समजू शकेल. भेट देणारे पर्यटक हे कोणतातरी उद्देश मनात ठेऊन भेट देत असतात. त्यामुळे त्यांच्या मनात काहीतरी नवीन जाणून किंवा माहित करून होण्याची उत्सुकता असते. मात्र माहिती मिळत नसल्याने त्यांची कुचंबणा होते. प्रदर्शित वस्तू योग्यप्रकारे दिसली पाहिजे. यासाठी अत्याधुनिक विद्युत प्रकाश उपकरणाची आवश्यकता आहे. कारण बऱ्याच प्रदर्शित वस्तू दुरुन दिसत नाहीत हे मी स्वत: अभ्यासले आहे. संग्रहालयय परिसरात स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय हवी. कारण अनेक पर्यटक बाहेर गावाहून येतात. हे पर्यटक भोजनदेखील याच परिसरात करतात. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची सोय होत नाही. संग्रहालय परिसरात वेगवेगळे पशुपक्षी आहेत. मात्र त्यासंबंधी माहिती लावलेली नाही. ती लावणे आवश्यक वाटते.

शिवाजी विद्यापीठातील वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालयाविषयी पर्यटकांच्या विशेष काही सूचना नाहीत. मात्र प्रतिक्रिया फारच बोलक्या व विद्यापीठाचे संग्रहालय निर्मितीचे उद्दिष्ठ साध्य करणाऱ्या आहेत. शांतिलाल शहा (पुणे) लिहितात, ''वि.स. खांडेकर स्मृती संग्रहालय पाहण्याचा सुयोग आला. थोर व विद्वावत तत्वचिंतकांचे हे साहित्य ही फार मोठी राष्ट्रीय संपत्ती आहे. त्यांनी दिलेले विचार आपणास व पुढील पिढीस दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरतील. त्यांचा आदर्श आपण ठेवणे आवश्यक आहे. त्यांनी केलेली मराठी भाषेची सेवा अवर्णनीय आहे. वाचनाची सवय लागावी व मनावर सुसंस्कार व्हावेत म्हणून विद्यापीठाने जपून ठेवलेले हे धन कौतुकास्पद आहे. जास्तीत जास्त लोक याचा फायदा घेतील अशी आशा धरू या !''

श्री. खांडेकर पी.बी. (वडगाव) म्हणतात, ''वि.स. खांडेकरांच्या जीवनपठाचे व साहित्य निर्मितीचे दर्शन आधुनिक पिढीला निश्चितपणे एका दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरेल. भौतिक सुखापेक्षा साहित्यातून मिळणारे आत्मीक सुख निश्चितच प्रशंसनीय आहे. हे त्यांचे सचित्र साहित्य पाहिल्यानंतर लक्षात येईल यात शंका नाही. तसेच त्यांनी आपल्या कार्यातून स्वत: एक आदर्श शिक्षक व साहित्यिक कसा असावा याचे दर्शन होते. त्यांच्या आठवणींना उजाळा देण्याचा हा प्रयोग प्रशंसनीय आहे. ही संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल शतश: आभार.''

इटानगर (अरुणालचप्रदेश) येथून आलेले डॉ. विनोदकुमार मिश्र लिहितात, ''कोल्हापुर का प्रवास आजसे चिरस्मरणीय हो जायेगा, मा. विष्णु स. खांडेकर की तपोभूमि में आकर मैं धन्य हो गया, किसी साहित्यकार के समग्र जीवन की जीती जागती झाँकी इस संग्रहालय को सदा जीवंत रखेंगे, इस भगीरथ प्रयत्न में शामिल विभोतियो को धन्यवाद ! ए साधुवाद की पात्र है, परम आदरणीय डॉ. लवटे की उनके इस सद्कृत के लिए आनेवाली पीढी सदा याद रखेगी ऐसा मेरा विश्वास है ।''

**निष्कर्ष :**

ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व औद्योगिक इ. विविध दृष्टिकोणातून महत्त्व असलेले कोल्हापूर हे पर्यटन केंद्र म्हणून उदयास येत आहे. ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेल्या या शहरात अनेक प्रेक्षणीय वास्तू व स्थळे आहेत. या पर्यटन स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या लाखोत आहे. त्यामुळे कोल्हापूरचा पर्यटन विकासाच्या दृष्टिकोणातून प्रयत्न व विकास चालू आहे. या पर्यटन विकासाचा एक स्त्रोत म्हणून कोल्हापूरातील वस्तुसंग्रहालयाचे महत्त्व व भूमिका महत्त्वाची ठरलेली आहे. ऐतिहासिक, सांस्कृतिक व शैक्षणिक भूमिका पार पाडणारी ही संग्रहालये कोल्हापूरात येणाऱ्या पर्यटकांचे आकर्षण आहे. कोल्हापूरला येणारे एकूण पर्यटक व संग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत जरी तफावत असली तरी त्यास संग्रहालय प्रशासनाची कार्यक्षमता व अनास्थाच सर्वस्वी जबाबदार आहे. त्याचे पडसाद स्थानिक वृत्तपत्रे व पर्यटकांच्या प्रतिक्रियामधून दिसून येतात. संग्रहालयास भेट देणाऱ्या पर्यटकांनी केलेल्या सूचना महत्त्वपूर्ण असून भावी काळात जर संग्रहालयाचा विकास व त्या अनुषंगाने जर पर्यटन विकास अपेक्षित असेल तर वरील सूचनांचा विचार करणे महत्त्वपूर्ण ठरणार आहे किंवा ठरू शकेल. कारण या सूचना व त्यातील त्रूटी संग्रहालय विकासास अडथळा ठरू शकतात. त्यामुळे यांचा विचार संग्रहालय प्रशासनाने करणे गरजेचे आहे.

-----

## संदर्भ सूची व तळटिपा

१) सिंग रतनदिप, टॉरिझम टूडे, दिल्ली, १९९४, पृ. १००.

२) कित्ता, पृ.१००.

३) कित्ता, पृ.१११.

४) भाटिया ए.के., इंटरनॅशनल टूरिझम, न्यू दिल्ली, १९९९, पृ. ३८.

५) कित्ता, पृ.१-३.

६) सिंग रतनदिप, उपरोक्त, पृ १११.

७) पूर्वी पर्यटनाचे स्वरुप व संख्या उच्चवर्गीय व श्रीमंत वर्गापूरती मर्यादित होती. मात्र गेल्या दशकापासून सर्वसामान्य वर्गातील लोकांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झालेली असून पर्यटन व पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली आहे. त्यामुळे यास पर्यटनाचे लोकशाहीकरण असे म्हणतात. (पर्यटन भूगोल, पृ.९)

८) पूर्वीच्या पर्यटन स्थळामध्ये मोठ्या संख्येने येणाऱ्या पर्यटकांची सर्व प्रकारची सोय खास सवलतीच्या कमी दरामध्ये करण्याकडे आयोजकांची प्रवृत्ती वाढत आहे. अशा मोठ्या संख्येने पर्यटनास जाणाऱ्या लोकांकडे मनोरंजन व इतर सुविधा स्वत:च उपलब्ध केलेल्या असतात, वाहनांची सोय त्या गटाने स्वत:च केलेली असते म्हणून या पर्यटनाला सामाजिक पर्यटन असे म्हणतात. (पर्यटन भूगोल, पृ.९)

९) भाटिया ए.के., उपरोक्त, पृ. ४८.

१०) दै. लोकसत्ता, ४ जून, २००७, पृ. ११.

११) दै. सकाळ, ६ मे, २००७, (पुरवणी) पृ.१.

१२) सिंग रतनदिप, उपरोक्त,पृ. १२३.

१३) कणबरकर रा.कृ., राजर्षि शाहू महोत्सव १९९३, कोल्हापूर, पृ. ६५

१४) तळेकर विक्रमसिंह, करवीर नगरी, कोल्हापूर, १९७४, पृ. २६.

१५) कित्ता, पृ.२४.

१६) गर्गे स.मा., अखेरचा मुजरा, पृ. ८६.

१७) तळेकर विक्रमसिंह,उपरोक्त, पृ. २५-२६.

१८) डॉ. बोरकर रा.रा., डॉ. उत्तम सावंत, भारतीय पुरातत्वशास्त्र, पृ. २३०.

१९) संग्रहालय कार्यालयातून प्रत्यक्ष माहिती घेतली.

२०) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची स्थापना इ.स. १९७५ मध्ये करण्यात आली. पर्यटन क्षेत्राचा शोध, विकास, मार्गदर्शन इ. कार्ये यांच्यामार्फत हातात. याशिवाय काही पर्यटन स्थळावर निवासस्थानाची सुविधा व वाहतूक सेवा पुरवली जाते.(पर्यटन भूगोल,पृ.१६५)

२१) दै. लोकमत, १३ मे, २००७, पृ. ५.

२२) पन्हाळा गिरीस्थान नगरपालिका कार्यालयातून प्रत्यक्ष माहिती घेतली.

२३) संग्रहालय कार्यालयातून प्रत्यक्ष माहिती घेतली.

२४) भाटिया ए.के., उपरोक्त, पृ. ४३.

२५) दै. सकाळ, २० नोव्हेंबर, २००६, पृ.१.

२६) कित्ता, ७ फेब्रुवारी, २००७, पृ.१.

२७) या संदर्भासह खालील सर्व अभिप्राय संग्रहालय कार्यालयातील अभिप्राय नोंदवही व पर्यटकांच्याकडून भरून घेतलेल्या प्रश्नावलीवर आधारीत आहेत.

-----